I.O. 7A

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर  **P.S.(ठाणे):** विवेकानंद चौक पोलीस स्टेशन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0205  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/03/2025 22:51

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिनांक पासून):** 12/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 8  **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/03/2025
**Time From (वेळेपासून):** 23:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/03/2025  **Time (वेळ):** 22:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/03/2025 22:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 4 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बस्वेश्वर चौक लातूर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ओमकार महादेव विभुते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2001

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माळकांेडजी ताऔसा जिलातूर ,विवेकानंद चौक पोलीस स्टेशन,लातूर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माळकांेडजी ताऔसा जिलातूर ,विवेकानंद चौक पोलीस स्टेशन,लातूर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888544872

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेष्वर विनायक जमादार | | | 1. नेम पोलीस ठाणे, भादा ता औसा ,विवेकानंद चौक पोलीस स्टेशन,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक:- 25/03/2025

फिर्याद

मी ओमकार महादेव विभुते वय 24 वर्षे, व्यवसाय व्यापार रा.माळकांेडजी ता.औसा जि.लातूर मो.नं. 8888544872

समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब देतो की, मी वरील प्रमाणे असुन माळकांेडजी ता. औसा जि. लातूर येथे कुटूंबासह राहण्यास आहे. माळकांेडजी येथे ओम डेअरी नावाचा व्यवसाय करतो. तसेच मी व माझे वडील षेती व्यवसाय करतो. त्यावर आमच्या कुटूंबाची उपजिवीका चालते. मी दिनांक 12/03/2025 रोजी दुपारी 16ः:30 वा. सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालय येथे येवून पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांची भेट घेवून माझी एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे तोंडी सांगितले. त्यावर पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी सापळा कारवाई करीता दोन षासकीय पंच उपलब्ध करून घेतले होते. सापळा पथक व पंच यांचेषी माझी व मला त्यांची ओळख करून दिली होती. त्यानंतर सापळा पथकातील सदस्य व पंचांना माझे नाव गाव सांगून थोडक्यात माझी तक्रार सांगून ती माझ्या हस्ताक्षरात पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांचे समक्ष लिहून दिली होती. ती पुढीलप्रमाणे आहे.

"मी वरील ठिकाणी माझे कुटूंबासह राहणारा असुन ओम डेअरी फार्मचा व्यवसाय करतो. दि.07/03/2025 रोजी षांती निकेतन आश्रम षाळा देवताळा येथे दहावी - बारावी परिक्षा चालु असताना परिक्षा केंद्राच्या गेटवर असलेल्या होमगार्ड यांच्याषी माझा वाद झाला होता. त्यावरून त्यांनी माझ्याविरूध्द भादा पोलीस स्टेषन येथे गुरनं. 45/2025 कलम 132, 121 (1), 352,351 (1) भारतीय न्याय संहिता 2023 दि.07/03/2025 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दि.07/03/2025 रोजी दुपारी 16.42 वा. सुमारास भादा पोलीस स्टेषन अंतर्गत बेलकुंड पोलीस चौकीचे पोलीस कर्मचारी जमादार यांनी त्यंाच्या मो.नं.8600388491 वरून माझा मो.नं. 7028888748 वर फोन केला होता. माझ्या विरूध्द गुन्हा दाखल झालेला आहे. तुम्ही बेलकुंड पोलीस चौकीला येवून मला भेटा असे सांगितले होते. त्यावेळी मी त्यांना सध्या बाहेर आहे. उद्या येतो असे सांगितले होते.

त्याप्रमाणे मी दिनांक 08/03/2025 रोजी आमचे गावचे सरपंच श्री.जयषंकर विभुते यांचेसह बेलकुंड पोलीस चौकी येथे जावून पोलीस कर्मचारी जमादार यांची भेट घेतली असता, त्यांनी मला एफआयआर दाखवली आणि माझ्याकडे आधार कार्ड, 3 फोटो मागितले होते. ते मी त्यांना दिले. त्यानंतर त्यांनी एका नोटीसवर माझी सही घेतली आहे. परंतू त्याची प्रत त्यांनी मला दिली नाही. पोलीस कर्मचारी जमादार यानंी त्यावेळी मला तपासात मदत करतो, अटक करत नाही, नोटीस देवून सोडून देतो त्याकरिता मला 30,000/- रू. द्यावे लागतील नाही तर आता लगेच अटक करतो, असे म्हणून मला मारहाण करून चौकीमध्ये बसवून ठेवले होते. मी अटकेच्या भितीपोटी त्यांना 30,000/- रू. देण्याचे मान्य करून त्याचवेळी माझ्या जवळील 5,000/- रू. दिलेले आहेत. उर्वरीत 25,000/- रू. सोमवारपर्यंत आणून देण्यास सांगितले होते. परंतू मी सोमवारी त्यांचेकडे गेलो नाही. म्हणून ते मला फोन करत आहेत. परंतू मी त्यांचा फोन उचलला नाही.

पोलीस कर्मचारी जमादार (पुर्ण नाव माहित नाही). यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाल्याने मी तक्रार देण्यासाठी आलेलो आहे. पोलीस कर्मचारी जमादार यांना लाच देण्याची माझी ईच्छा नाही, माझे त्यांचेषी काही वैर नाही. अगर आमच्यात काही आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही. अगर बाकी नाही.'' अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीवर पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

दिनांक 12/03/2025 रोजी 19.30 वाजता मी, पोलीस निरीक्षक मुजावर साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने सापळा कार्यवाहीकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि., कार्यालय, लातूर

येथून रवाना होवुन तुळजापुर मोड, औसा येथे पोहोचलो. तेथे पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पोलीस कर्मचारी जमादार यांनी माझ्याकडे वर नमुद कामाकरीता लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पंचासमक्ष पडताळणी करून ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवून त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत मला पंचाना माहिती सांगून ते कोरे असल्याचे खात्री करून देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सिलबंध पाकीटातील नविन कोरे मेमरी कार्ड टाकून माझे, पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांचे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. मला व पंचाना तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांना पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी योग्य त्या सुचना दिल्या.

लाच मागणी पडताळणी करीता पाठविण्यापुर्वी लोकसेवक पोलीस कर्मचारी जमादार सध्या कोठे आहेत याची माहिती घेण्यासाठी माझ्या मो.क्र.7028888748 वरून लोकसेवक जमादार यांचा मो.क्र. 8600388491 वर 21ः:25 वाजता फोन केला असता लोकसेवक जमादार यांनी मी लातूरमध्ये आहे. तुला अर्ध्या तासात फोन करतो असे म्हणाले. सदरचे फोनवरील झालेले संभाशण स्पिकर मोडवर करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे. मी व सापळा पथकातील सर्वजण लोकसेवक पोलीस कर्मचारी जमादार यांच्या फोनची वाट पाहत थंाबून राहीलो. त्यानंतर 22ः:22 वाजता लोकसेवक जमादार यांचा मो.क्र. 8600388491 वरून माझ्या मो.क्र.7028888748 वर फोन आला. त्यामध्ये त्यांनी मला बस्वेष्वर चौक, लातूर येथे समक्ष भेटण्याकरीता येण्यास सांगितले. सदरचे फोनवरील झालेले संभाशण स्पिकर मोडवर करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे. त्यावरून आम्ही सर्वजण औसा येथून नाईक चौक, लातूर येथे आलो. तेथे पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मला, पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी पोलीस अंमलदार 1769 कोंडरे यांच्या मदतीने 22.48 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डरचे बटन चालू करून माझ्या गळयात अडकावुन पंच क्र. 1 रूपनर यांच्या सोबत पोलीस कर्मचारी जमादार यांची भेट घेण्यासाठी बस्वेष्वर चौक, लातूर येथे रवाना केले. मी व पंचा क्र. 1 रूपनर बस्वेष्वर चौक,लातूर येथे माझ्या चारचाकी वाहनामध्ये पोलीस कर्मचारी जमादार यांची वाट पाहत थांबलो असताना त्यांनी माझ्या मोबाईल नंबरवर फोन करून मला कातपूर रोड वरील त्यांच्या घरी येण्यास सांगितले होते. परंतु पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही तिकडे न जाता सापळा पथक थंाबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोलीस अंमलदार 1769 कोंडरे यांनी 23ः:02 वाजता माझ्या गळयातील डिजीटन व्हाईस रेकॉर्डर घेवून त्याचे बटण बंद केले. तेव्हा पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मला व पंच क्र. 1 रूपनर यांना कामाच्या व लाच मागणीच्या अनुशंगाने काय चर्चा झाली याबाबत विचारले. तेव्हा आम्ही पोलीस कर्मचारी जमादार यांनी मला भेटण्याकरीता त्यांचे घरी बोलाविले आहे. असे सांगितले त्यावर पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मला पंचा क्र.1 रूपनर यांना त्यांचे घरी न जाता बस्वेष्वर चौकात थंाबून पोलीस कर्मचारी जमादार यांनाच त्याठिकाणी येण्यास भाग पाडावे, असे सांगून पुन्हा सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस अंमलदार 1769 कोंडरे यांच्या मदतीने 23ः:04 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डरचे बटन चालू करून माझ्या गळयात अडकावुन पंच क्र. 1 रूपनर यांच्या सोबत पोलीस कर्मचारी जमादार यांची भेट घेण्यासाठी बस्वेष्वर चौक, लातूर येथे पुन्हा रवाना केले. मी व पंच क्र.1 रूपनर बस्वेष्वर चौकात माझ्या चारचाकी वाहनामध्ये थंाबून असताना पोलीस कर्मचारी जमादार यांनी पुन्हा माझ्या फोनवर फोन करून प्रत्यक्ष भेटण्याकरीता आले. तेव्हा पंच क्र. 1 रूपनर यांना इषा-याने समोरून येणारी व्यक्ती ही पोलीस कर्मचारी जमादार असल्याचे सांगितले. पोलीस कर्मचारी जमादार हे माझ्या चारचाकी वाहनामध्ये पुढील डाव्या बाजूच्या सिटवर बसले व पंच क्र. 1 रूपनर हे पाठीमागील सिटवर बसून होते. पोलीस कर्मचारी जमादार यांनी पंचाबाबत चौकषी केली असता माझे मित्र असल्याचे मी त्यांना सांगितले. तसेच त्यांचे नाव विचाले असता पंच क्र. 1 रूपनर यांनी संतोश रूपनर असे नाव सांगितले. आमच्यात कामाच्या व लाच मागणीच्या अनुशंगाने चर्चा झाली. त्यामध्ये पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले, 'का पळायलास इकड तिकड' त्यावर मी म्हणालो 'तुमची भिती बसली सर' त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले, 'पळून काय होणर सांग, तूला आज ना उदया यावच लागणार, तू विनाकारण पळायला लागलास' त्यावर मी म्हणालो 'अॅडजेस्टमेंट होईना गेलती' त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले, 'बाकीच्या गोश्टी चालत राहतात, पण हे कसं आहे 353 चा विशय आहे.' त्यावर मी म्हणालो, 'अटक होवू नये म्हणून पर्याय सांगा... पुर्ण मला हयच्यातून बाहेर काढा'. त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले... अटक करत नाही.. जे कांही अटक होवू नये म्हणून मी जे कांही गोश्टी सरपंचाला मी बोललेल्या आहेत... त्यची पुर्तता करावी लागेल.... त्यावर मी म्हणालो .... कांहीतर कमी करून सांगा सर....त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले एकतर आपलं जे कांही तीस चं... बोलणं झालतं.... त्यावर मी म्हणालो ... हं... तीस हजार... त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले.... हं...हं...... त्यावर मी म्हणालो .... सर अॅडजस्ट व्हईना गेलेत...त्यच्यामुळं... त्यावर पोलीस कर्मचारी जमादार

म्हणाले... कितीपर्यंत करू षकतो....त्यावर मी म्हणालो .... तुम्हीच सांगा सर कमी करून काय तर.... त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले.... पाच कमी दे... बोलतो साहेबाला मी... त्यावर मी म्हणालो पंचवीस हजार का?....त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले... हं... बरं ठिक हाय बोलतो मी साहेबाला...तुझ्या बाजूने बोलतो साहेबाला व्यवस्थीत... थोडसं परेषान हाय असं तसं... ठिक हाय पाचचं..... त्यावर मी म्हणालो .... तपास तुमच्याकडंच हाय ना सर....त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले... हं.. कांही नाही...मी हाव... देतो व्यवस्थीत ... फक्त अषा गोश्टी इथून पुढं लक्षात ठेवं....एक मी षब्द देतोय...पाच कमी दे... मी बोलतो साहेबाला... जे कांही आपलं ठरलं होत... पाच तर पोहच झालेत....... त्यावर मी म्हणालो पाच हजार....त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले... पाच पोहच केलेतं की वाटतं...त्या दिवषी.... त्यावर मी म्हणालो .... हं....पाच हजार........त्यावर पोलीस कर्मचारी जमादार म्हणाले वीस एक... इकडून तिकडून कुठं तर अॅडजस्ट करून विशय जिकडं तिकडं विशय क्लियर कर...बाकीचं मी तुला जागेवर हे करतो....अटक वगैरे काय करत नाही.... सोडून देतो मी तुला....उदया दुपारपर्यंत कर, दोन वाजेपर्यंत... त्यावर मी म्हणालो हं.... असे म्हणून माझेकडे स्पश्टपणे लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम उदया दुपारी दोन वाजेपर्यंत घेवून येण्यास घेवून येण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक 13/03/2025 रोजी 12:00 वाजता मी व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य पुढील सापळा कारवाई करण्याकरीता हॉटेल संजय क्वालीटी, औसा रोड, लातूरच्या समोर सापळा कारवाईसाठी आवष्यक असलेल्या सर्व साहीत्यासह आलो. तेथून मी माझ्या मोबाईल नंबरवरून 12:32 वाजता पोलीस कर्मचारी जमादार यांचे मोबाईल नंबरवर फोन करून भेटण्यासाठी कोठे येवू याबाबत विचारले असता त्यांनी मी सध्या बेलकुंड पोलीस चौकीला आहे. तू इकडेच ये, अर्ध्या तासात तुला मोकळे करतो असे म्हणाले. त्यावर मी चौकली येवू षकत नाही मला भिती वाटते तुम्हीच लातूरला किंवा औष्याला या, असे म्हणालो असता त्यांनी औसा येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य पुढील सापळा कारवाई करण्याकरीता तुळजापूर मोड, औसा येथे येवून विजय मंगल कार्यालयाच्या बाजूस आमची वाहने थांबवून माझ्या मोबाईल नंबरवरून 13:25, 13:27, 13:33, 13:44 वाजता पोलीस कर्मचारी जमादार यांचे मोबाईल फोनवर फोन केले असता, ''आपण डायल केलेला नंबर सध्या व्यस्त आहे किंवा यावेळी त्यानंबरपर्यंत आपण पोहचू षकत नाही कृपया नंतर प्रयत्न करा'' असे उत्तर मिळालेले आहे. यावरून पोलीस कर्मचारी जमादार यांचा फोन लागत नाही म्हणून आम्ही सर्वजण सदर ठिकाणी थांबून पोलीस कर्मचारी जमादार यांचा फोन येण्याची वाट पाहत थांबलो. तेव्हा तेथे भादा पोलीस स्टेषनचे प्रभारी अधिकारी श्री भोळ साहेब व साध्या वेशातील दोन-तीन पोलीस कर्मचारी मला मोबाईल लोकेषनवरून षोधण्यासाठी आले होते. त्यांनी माझे चारचाकी वाहन चेक करून तेथून निघून गेले होते. त्यामुळे दिनांक 13/03/2025 रोजीची सापळा कारवाई तात्पुर्ती स्थगित करून माझ्यावर भादा पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयाची कार्यवाही पुर्ण करून घेवून नंतर पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

त्यावरून दिनांक 17/03/2025 मी पुढील लाच स्वीकृती सापळा कार्यवाहीसाठी दुपारी ला.प्र.वि. कार्यालय, लातूर येथे हजर आलो. दिनांक 13/03/2025 रोजी ते 17/03/2025 रोजी पर्यंत घडलेला घटनाक्रम सांगितला. त्यानुसार मी दिनांक 13/03/2025 रोजी रात्री औसा येथील पेषाने वकील असलेल्या माझ्या नातेवाईकांकडे माझ्यावर दाखल असलेल्या गुन्हयात अटकपुर्व जामिनाचा अर्ज करण्याकरीता गेलो असता त्यांचेकडून समजले की, मी दुपारी विजय मंगल कार्यालयाजवळ थांबलेलो असताना तेथे पो.स्टे.भादा चे प्रभारी अधिकारी भोळ साहेब आले होते. त्यांनी तुला तेथून एका चारचाकी वाहनातुन अनोळखी लोकांसोबत जाताना पाहिले होते. रात्री उषिरापर्यंत तुझी वाट पाहत त्याठिकाणी पोलीस ठेवले होते. परंतू तु न आल्यामुळे तुझे चारचाकी वाहन त्यांनी तेथून टोचन करून पोलीस स्टेषनला घेवून गेले होते. त्यावरून त्यांना तु काहीतरी शडयंत्र रचत असल्याचा संषय आहे. तसेच त्यांनी तु एसीबीकडे तक्रार केली असल्याची षक्यता आहे, असे त्यांना वाटत आहे. त्यामुळे ते तुला आता अटक करणार नसून नोटीस देवून सोडणार असल्याचे माझ्याकडे निरोप दिलेला होता. त्यावरून मी माझे नातेवाईक वकील यांचेसोबत बेलकुंड पोलीस चौकी येथे गेलो होतो. तेथे सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार पोलीस हवालदार षिंदे यांच्याषी माझी भेट झाली. त्यांनी मला नोटीस देवून सोडून दिले आहे. तसेच माझे चारचाकी वाहन माझ्या ताब्यात परत मिळाले आहे. यावरून माझ्या असे लक्षात आले की, पोलीस कर्मचारी जमादार यांचेकडे सदर गुन्ह्याचा तपास नसुन त्यांनी स्वतःच्या पदाचा प्रभाव निर्माण करून व प्रभारी अधिकारी भोळ साहेब यांचे नावाचा वापर करून तपास माझ्याकडे आहे, तुला तपासात मदत करतो, अटक करत नाही, नोटीस देवून सोडून देतो असे भासवून माझ्याकडे लाचेची मागणी केलेली आहे. सदरवेळी पोलीस कर्मचारी जमादार हे बेलकुंड पोलीस चौकीत मला दिसून आले नाहीत. यावरून माझी खात्री पटली आहे की, मी त्यांचेविरूध्द आपल्याकडे तक्रार केली असल्याचा त्यांना पक्का संषय आलेला आहे. बेलकुंड पोलीस चौकी येथे मी पोलीस

कर्मचारी जमादार यांचे बाबत अधिक माहिती घेतली असता त्यांचे पुर्ण नाव ज्ञानेष्वर विनायक जमादार पद -पोलीस षिपाई ब.नं. 1824 असे असल्याचे समजले.

त्यानुसार मी, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथकातील सदस्य असे दिनांक 17/03/2025 रोजी 16.30 वा. पुढील कार्यवाही करण्याकरीता खाजगी वाहनाने सापळा कार्यवाहीसाठी आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह खाजगी वाहनातून लातूर येथून रवाना होवून औसा ते उमरगा जाणारे रोडचे आडबाजूस आमचे वाहन उभे करून थांबलो. त्यानंतर सापळा कार्यवाहीकरीता पाठविण्यापुर्वी लोकसेवक पोलीस कर्मचारी जमादार यांना औसा येथे येण्यासाठी तक्रारदार यांचे मो.क्र. 7028888748 वरून लोकसेवक जमादार याचा मो.क्र. 8600388491 वर 17.29 व 17.38 वाजता असे एकुण दोन वेळेस फोन केला असता दोन्ही वेळेस लोकसेवक जमादार यांचा मोबाईल फोन ‘‘ आपण ज्या नंबरषी संपर्क करू ईच्छीता, तो सध्या बंद आहे कृपया नंतर प्रयत्न करा’’ असे उत्तर मिळालेले आहे. लोकसेवक जमादार यांच्याषी फोनद्वारे संपर्क होवू षकला नाही. तसेच मी लोकसेवक जमादार यांचेबाबत माहिती घेतली असता तीन दिवसापासुन ते पोलीस चौकीला आले नसल्याचे समजले. त्यामुळे लोकसेवक जमादार यांचेषी प्रत्यक्ष भेट झालेली नाही. यावरून त्यांना संषय आला असावा त्यामुळे ते माझ्याकडून आता पैसे घेतील असे वाटत नाही.

तरी यातील लोकसेवक ज्ञानेष्वर विनायक जमादार पद -पोलीस षिपाई ब.नं. 1824 नेमणूक पोलीस ठाणे, भादा ता.औसा जि.लातूर यांनी माझेवर दाखल असलेल्या गुन्हयात मदत करतो, अटक करीत नाही, नोटीस देवून सोडून देतो असे म्हणून दिनांक 12/03/2025 रोजी बस्वेष्वर चौक लातूर येथे पंचासमक्ष 30,000/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 25,000/- लाचेची मागणी केलेली आहे. त्यापैकी 5,000/- रूपये दिनांक 08/03/2025 रोजी पोहोच झाल्याचे मान्य केले व उर्वरीत 20,000/- रूपये लाचेची रक्कम दिनांक 13/03/2025 रोजी स्विकारण्याचे मान्य केले होते. परंतु त्यांना संषय आल्याने लाचेची रक्कम जाणीवपूर्वक स्विकारण्याचे टाळले आहे. म्हणुन माझी लोकसेवक ज्ञानेष्वर विनायक जमादार पद -पोलीस षिपाई ब.नं. 1824 नेम. पोलीस ठाणे, भादा ता. औसा जि. लातूर यांच्या विरुध्द लाच मागणीची कायदेषिर तक्रार आहे.

मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोह/65 बी.व्ही.आलूरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे संगणकावर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष ही फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH ASHOK PATIL(I (Inspector)) / POBN45678 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(व्ही.एस.मुळे)
सहायक पोलीस निरीक्षक
पो.स्टे.विवेकानंद चौक,लातूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH ASHOK PA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN45678